पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/०७/२०१९
दिनांक : ०३/०१/२०१९

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची (विशेष) सभा दिनांक **०८/०१/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची (विशेष) सभा **मंगळवार** दिनांक **०८/०१/२०१९** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती (विशेष)**

कार्यपत्रिका क्रमांक – **१७**

दिनांक : **०८/०१/२०१९** वेळ : दु. **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची (विशेष) सभा **मंगळवार** दिनांक **०८/०१/२०१९** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

-------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये, " जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ " स्थापन करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.६८४ दि.१३/५/२०१५ अन्वये पारित झाला आहे. संतपीठाच्या स्थापनेच्या उपक्रमातुन संत साहित्याचा वारसा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील नागरीकांना मिळावा या उद्देशाने समाजाला अध्यात्मीक मार्गातुन चांगले विचार देण्याचा प्रयत्न राहील. संतपीठाच्या माध्यमातुन भविष्यात सांप्रदाय व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा प्रसार होणार आहे. सर्व महान संतांचे विचार हे आजच्या पिढीपर्यंत पोहचविणे अत्यंत गरजेचे आहे जेणेकरून अशा उपक्रमाचा फायदा शहरातील वातावरण चांगले राहण्यासाठी मदत होईल. ज्या टाळगाव चिखली येथे संतपीठ होणार आहे, त्या गावास सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. संतपीठाच्या माध्यमातुन पिंपरी चिंचवड शहर हे संस्कृती जपणारे शहर असा उल्लेख, महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभर होईल. पिंपरी चिंचवड परिसरामध्ये वारकरी व भागवत सांप्रदायाला मानणारा खूप मोठा समाज आहे. संत विचार, संस्कृती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, संतपीठ कार्यरत करणेसाठी कंपनी कायद्यान्वये ना नफा तत्वावर कंपनी स्थापन करणेत येत आहे. त्यादृष्टीने या परिसरामधील मुलांना आध्यात्मिक व अधुनिक तंत्रज्ञानासह शिक्षण देऊन, त्याबरोबर संताच्या वाड्.मयाचा प्रसार होण्यासाठी व तशी फेरबदल करण्याची तरतुद, सी.बी.एस.सी. बोर्डच्या अभ्यासक्रमातच असल्याने त्याप्रमाणे अंतर्भावही निश्चीत करावयाचा आहे. यामध्ये सर्व सांप्रदाय व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा अभ्यास यामध्ये करावा लागणार आहे. व त्यासाठी सी.बी.एस.सी. बोर्डाची मान्यता घ्यावी लागणार आहे. याठिकाणी मुलांचे अशा प्रकारे शिक्षण होणार आहे. की, त्याचा अध्यात्मिक पाया पक्का होईल व या माध्यमातुन चांगले नागरीक घडविणे शक्य होणार आहे. अभ्यासक्रम ठरविताना त्यामध्ये अनुषंगिक विविध विषयांचा अंतर्भाव करावा लागणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य फ मुख्य कार्यालयामार्फत, प्रभाग क्र.१ चिखली गट नं.१६५३ पैकी, आरक्षण क्र.१/८९, माध्यमिक शाळा, यावर शाळा व संतपीठासाठी इमारत बांधणेसाठी बांधकाम परवानगी घेतलेली आहे व त्याची निविदा कार्यवाही सुरू आहे. सदर कामाचा कालावधी ३० महिन्यांचा असणार आहे. " जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ ", या नावाने कंपनी स्थापन करावी लागणार आहे. सदर कंपनीचे व्यवस्थापन चालविणेसाठी, खालील प्रमाणे नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | नाव | पदनाम | कंपनीचे पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री.श्रावण हर्डीकर | आयुक्त, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध अध्यक्ष तथा संचालक |
| २ | श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा अधिकारी, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध संचालक |
| ३ | श्रीम.ज्योत्स्ना शिंदे | प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सचिव तथा संचालक |
| ४ | श्री.पराग मुंढे | प्र.शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सदस्य |
| ५ | श्री.चंद्रकांत इंदलकर | प्र.कायदा सल्लागार, कायदा विभाग पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सदस्य |
| ६ | डॉ.श्री.सदानंद मोरे | प्राध्यापक व संत साहित्याचे गाढे अभ्यासक | सदस्य |
| ७ | श्री.राजु ढोरे | हरि भक्त परायण | सदस्य |
| ८ | श्री.तानाजी शिंदे | सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी | सदस्य |
| ९ | श्रीम.स्वाती मुळे | तज्ञ सल्लागार | सदस्य |

वरीलप्रमाणे " जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ " ही कंपनी, कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत ना नफा तत्वावर स्थापन करणेसाठी, Ministory of corporate Affairs यांचे कार्यालयाकडे मान्यता घेणेसाठी अर्ज करून, नोंदणी करणेस मान्यता असावी. तसेच सदर कंपनी स्थापन करणेकरीता मे.के.जे.एल.अँड असोसिएट्स तर्फे श्री.क्षितिज लुंकड या कंपनी सेक्रेटरी यांची नेमणूक केली आहे. त्यांचेमार्फत कंपनी स्थापन करणेचे काम करणेत येणार आहे व त्या कंपनीमध्ये वरीलप्रमाणे संचालक व सदस्यांची नेमणूक करणेस मान्यता असावी, तसेच कंपनीचे व्यवस्थापन चालविणेसाठी संघटनेचा मसुदा (Memorandum of Association) मान्य करण्यास संचालकांस अधिकार देण्यास मान्यता असावी. कंपनी स्थापन करण्यासाठी सध्याचे संचालकांची व अधिकारी सदस्यांची भविष्यात बदली होईल अथवा अन्य कारण असेल त्यावेळी नविन अधिकारी संचालकांची व अधिकारी सदस्यांची, Digital Signature Certificate (DSC) व

Directors Identification Number (DIN) तयार करून घ्यावे लागेल त्यास मान्यता असावी. कंपनी स्थापन केल्यानंतर अभ्यासक्रम निश्चीत करून, संचालक मंडळामार्फत सी.बी.एस.सी. बोर्डाची मान्यता घेण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/०७/२०१९
दिनांक : ०३/०१/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc